# विजेच्या लपंडावाने जनता हैराण

## नागरिकांच्या तक्रारींना केराची टोपली : समस्येकडे अधिकारी लक्ष देणार?

**पुणे : हॅलो प्रभात**

सोमनाथ साळुंके



वडगाव शेरी विधानसभा मतदार संघातील विविध भागात सतत होणाऱ्या विजेच्या लपंडावाने वीजग्राहक हैराण झाल्याने नागरिकांच्या मुख्य समस्येकडे महावितरणचे अधिकारी लक्ष देऊन असलेल्या अडचणीस अधिकारी प्राधान्य देणार का?याकडे सर्व मतदार संघातील वीजग्राहकांचे लक्ष वेधून लागले आहे.

सध्याचे जग हे माहिती तंत्रज्ञानाच्या पुढे जात असल्यामुळे समाजातील नागरिकांना इतर गरजाप्रमाणेच वीजेची असलेली आवश्यकता अधिक भासू लागली असतानाच सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने नागरिकांना अधिकच विजेची गरज भासत आहे.त्यातच पूर्व हवेली भागातील आयटीआय कंपन्याचे जाळे पसरलेल्या खराडीसह,वडगाव शेरी,येरवडा,धानोरी,लोहगाव,विश्रांतवाडी भागात सध्याच्या काळात खाजगी बांधकाम व्यावसायिकांनी टोलेजंग इमारती उभारल्यामुळे वीजग्राहकांच्या संख्येत अधिक वाढ होऊन मतदार संघात जवळपास एक कोटीच्या आसपास वीजेचे ग्राहक असल्याचे समजते. मात्र सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे उष्णतेची तीव्रता देखील तेवढ्याच प्रमाणात वाढली आहे.त्यामुळे अनेकांनी गारवा मिळावा या उद्देशाने घरामध्ये पंखे,कुलर असे साहित्य बसविले असले तरी पण राजरोजपणे नेहमीच विविध भागातील होणाऱ्या खंडीत वीजपुरवठ्यामुळे नागरिकांना बाहेर उन्हाचा तडका तर घरात खंडीत वीजपुरवठ्याचा फटका सहन करण्याची वेळ येऊन होणाऱ्या त्रासामुळे अनेक नागरिक हैराण झाले आहेत.खंडीत होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे अनेक ग्राहक हे कर्मचारी अथवा अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत असले तरी पण अनेक वेळा एक तर अधिकारी फोन उचलत नाही,अन्यथा उचलला गेला तर त्यांच्या उडवाउडवीच्या उत्तराचा सामना ग्राहकांना करण्याची वेळ नागरिकांवर येत आहे.

त्यामुळे अधिकाऱ्यांना यासंदर्भात विचारणा करायची की,नाही आता हाच प्रश्न वीजग्राहकासमोर उभा राहिला आहे.अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू असतानाच ग्राहकांना आणखी एका मुख्य समस्येला तोंड देण्याची वेळ येत आहे. अगोदरच वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले असताना अशा महागाईत मुलांचे शिक्षण व घरसंसार चालविणे अवघड झाले असताना एखाद्या वीजग्राहकास वीजभरणा करण्यास विलंब झाल्यास अशा वीजग्राहकांना कोणत्याही प्रकारची पूर्व कल्पना न देता त्यांचा वीजपुरवठा खंडीत करण्याचे काम अधिकाऱ्याकडून केले जात असल्याने अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अंधारात बसण्याची वेळ येत आहे. त्यामुळे अनेक ग्राहक हे खाजगी सावकाराकडून किंवा कर्जे काढून वीजेचा भरणा करत आहेत.

जर वीजेचा भरणा करून देखील नागरिकांना अधिकाऱ्यांच्या भोंगळ कारभारामुळे वीजपुरवठ्यापासून खंडीत राहण्याची वेळ येत असेल तर महावितरणचे अधिकारी खरोखरच जनतेचे प्रश्न सोडवण्यास सक्षम आहेत का? हा मुख्य सवाल सतत होणाऱ्या विजेच्या लंपडावाने उपस्थित होत आहे. तरी नागरिकांच्या मुख्य समस्येकडे महावितरण अधिकाऱ्यांनी लक्ष केंद्रीत करून मतदार संघ खंडित वीजपुरवठ्यापासून कशा पद्धतीने मुक्त होईल यासाठी लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे.

### जनतेच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरू

**नागरिकांच्या मुख्य अडचणी समजावून ते सोडविणे हे काम अधिकाऱ्यांचे आहे.त्यामुळे महावितरण अधिकाऱ्यांनी प्रथम उडवाउडवीची उत्तरे देण्यापेक्षा ग्राहकांच्या समस्येकडे लक्ष केंद्रीत करावे.अन्यथा जनतेच्या मुख्य समस्या सोडविण्यासाठी वेळप्रसंगी रस्त्यावर उतरू. - अच्युतराव मोळावडे, मनसे संघटक**

**ग्राहकांच्या समस्येला केराची टोपली मतदार संघात वीजपुरवठा खंडीत झाल्यावर काही भागातील नागरिकांना अनेकदा तब्बल तीन ते चार तास वीजेची प्रतीक्षा करून अंधारात बसण्याची वेळ येते.यानिमित्त अनेक ग्राहक हे अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करतात.मात्र नागरिकांच्या मुख्य समस्येकडे अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याऐवजी त्याकडे पाठ फिरवून केराची टोपली दाखविण्याचे काम केले जात असल्यामुळे वीजेपेक्षा अधिकाऱ्यांच्या मनमानी पुढे वीजग्राहकांना अनेक वेळा गुडगे टेकण्याची वेळ आली आहे.**

# 'शरद'च्या ८६ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड

**यड्राव : हॅलो प्रभात**

यड्राव येथील शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या ८६ विद्यार्थ्यांची सेडमॅक मेकॅट्रॉनिक्स आणि वेद इंडस्ट्री या दोन नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, ऑटोमेशन अँड रोबोटिक्स व मेकॅट्रॉनिक्स विभागातील विद्यार्थ्यांना ही संधी मिळाली. सेडमॅक मेकॅट्रॉनिक्स कंपनीत एकूण ५६ विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यात इलेक्ट्रॉनिक्स ४०, मेकॅनिकल २, इलेक्ट्रिकल ७, ऑटोमेशन अँड रोबोटिक्स २ व मेकॅट्रॉनिक्स ५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. वेद इंडस्ट्रीमध्ये ३० विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यात मेकॅनिकल १४ व इलेक्ट्रिकल १६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सेडमॅक मेकॅट्रॉनिक्स ही पुणे येथील ऑटोमोबाईल व औद्योगिक नियंत्रण प्रणाली विकसित करणारी कंपनी असून ECU, EFI, ISG व मोटर कंट्रोलर्स तयार करते. तर वेद इंडस्ट्री फाउंड्री क्षेत्रात कार्यरत असून CI, SG आयर्न व डक्टाइल आयर्न कास्टिंग तसेच मशीनड कॉम्पोनंट्सचे उत्पादन करते. महाविद्यालयात ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अंतर्गत विद्यार्थ्यांना ग्रुप डिस्कशन, इंटरव्ह्यू टेक्निक्स, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट व मॉक इंटरव्ह्यूचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना प्लेसमेंट प्रक्रियेत झाला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे चेअरमन आमदार डॉ. राजेंद्र पाटील-यड्रावकर, कार्यकारी संचालक अनिल बागणे यांनी अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल व सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### एडीसीईटीमध्ये 'प्लेसमेंट डे सेलिब्रेशन २०२६' उत्साहात संपन्न

**आष्टा : हॅलो प्रभात**

अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, येथे 'प्लेसमेंट डे सेलिब्रेशन २०२६' हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या थाटात पार पडला. कार्यक्रमास उद्योग क्षेत्रातील मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रार्थनेने करण्यात आली. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. संदीप मग्दुम यांनी स्वागत करत विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील वाढत्या संधी, आवश्यक कौशल्ये तसेच संस्थेकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनाची माहिती दिली. संस्थेचे सचिव ॲड. राजेंद्र डांगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात सीसीटेक, पुणेचे सहसंस्थापक व सीबीओ विजय माळी तसेच माजी विद्यार्थी सागर अंतुरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे डायरेक्टर डॉ. एल. वाय. वाघमोडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सातत्याने शिकत राहण्याचे आवाहन केले. प्रमुख पाहुण्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, टीमवर्क, संवाद कौशल्य आणि समस्या सोडवण्याची क्षमता यांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी विविध विभागांतील प्लेसमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात प्लेसमेंटसाठी योगदान देणाऱ्या प्राध्यापकांचाही सन्मान करण्यात आला. डीन डॉ. अमोल डांगे, डॉ. प्रसाद कुलकर्णी, डॉ. शैलेंद्र हिवरेकर यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आले.

### पेपरफुटी प्रकरणात स्वाक्षरीचे नमुने न्यायवैद्यक प्रयोगशाळेत

**पुणे : हॅलो प्रभात**

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या 'नीट' परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी शिवराज मोटेगावकर आणि मनिषा मांढरे यांच्या स्वाक्षरीचे नमुने न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवले जाणार आहेत. राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) किंवा इतर महत्वाच्या कागदपत्रांवर आणि बँक व्यवहार करताना केलेल्या स्वाक्षरीचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) करण्यात येणार आहे. नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका पुण्यातून थेट राजस्थानपर्यंत पोचल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणात अटकेत असलेल्या पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयातील प्राध्यापिका मनिषा मांढरे आणि कात्रज परिसरातील मनिषा वाघमारे या दोघींनी संगनमत करून अनेक विद्यार्थ्यांशी संपर्क साधल्याचा संशय आहे.

# अभ्यासक्रमात नकाशा समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी मोर्चाचे आयोजन

**पुणे : हॅलो प्रभात**

हिंदू पदपादशाही आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासाच्या गौरवासाठी शुक्रवारी, दि. २२ रोजी सकाळी ९ वाजता 'महाराष्ट्र धर्म मोर्चा'चे आयोजन करण्यात आले आहे. लाल महाल ते जिल्हाधिकारी कार्यालय असा हा मोर्चा निघणार असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशज सातारा गादीच्या छत्रपती वृषालीराजे भोसले या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. 'अटक ते कटक मराठा साम्राज्याचा नकाशा' या संकल्पनेवर आधारित या मोर्चाद्वारे मराठा इतिहासाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. आयोजकांनी महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकारशी संवाद साधून अटक येथील मराठा साम्राज्याच्या नकाशाची पुनर्स्थापना करावी, सदर विषयाला राज्य शासनाने अधिकृत भूमिका देऊन महाराष्ट्रातील जनतेच्या भावना केंद्र शासनापर्यंत ठामपणे पोहोचवाव्यात आदि मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे. "ज्यांनी स्वाभिमान पाळला तोच खरा नकाशा आहे," असा संदेश देत या मोर्चासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कत्तलखान्यांविरोधात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट

**बारामती शहर : हॅलो प्रभात**



मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी महाराष्ट्र राज्याच्या कार्यक्षम उपमुख्यमंत्री आदरणीय श्रीमती सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन बारामती शहरातील बेकायदेशीर कत्तलखान्यांच्या संदर्भात निवेदन देण्यात आले. बारामती शहरातील कऱ्हा नदीपात्र परिसरात पूर्वी सील करण्यात आलेले ८ बेकायदेशीर कत्तलखाने पुन्हा सील तोडून तसेच पत्रे काढून सुरू करण्यात आले असून, त्या ठिकाणी पुन्हा गोवंशाची कत्तल सुरू असल्याची गंभीर बाब निदर्शनास आणून देण्यात आली. संबंधित सर्व बेकायदेशीर कत्तलखाने तात्काळ उध्वस्त करण्यात यावेत, तसेच शासकीय कत्तलखान्यात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली म्हैसवर्गीय जनावरांची कत्तल, नदीमध्ये सोडले जाणारे रक्त व घाण, तसेच आवश्यक विभागीय परवानगी शिवाय सुरू असलेला कत्तलखाना तात्काळ बंद करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. या भेटीदरम्यान बारामतीतील सद्यस्थिती, स्थानिक नागरिकांच्या भावना, आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, पर्यावरणाची होत असलेली हानी, तसेच कऱ्हा नदीपात्र परिसरातील रक्त व घाणीमुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती याबाबत सविस्तर माहिती वहिनींसमोर मांडण्यात आली. यावेळी या विषयावर सकारात्मक चर्चा झाली. चर्चेदरम्यान स्वर्गीय अजित दादांच्या कार्याची आठवणही झाली. बारामतीतील कत्तलखान्यांविरोधातील संघर्षाच्या काळात त्यांनी घेतलेली ठाम भूमिका आणि संबंधित कत्तलखाने सील करण्यासाठी केलेले प्रयत्न आजही प्रेरणादायी असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. काही व्यक्ती काळाच्या पडद्याआड जातात, मात्र त्यांचे कार्य आणि संघर्षाची प्रेरणा कायम स्मरणात राहते. यावेळी प्रशांत सातव व प्रतीक भेगडे उपस्थित होते.

# बाधित कुटुंबियांचे खा. विशालदादा पाटील व विक्रमसिंह सावंत यांनी केले सांत्वन

**जत : हॅलो प्रभात**



जत तालुक्यातील मोटेवाडी येथे मरगूबाई यात्रेदरम्यान अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे उभारण्यात आलेले पत्राशेड व भिंत कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत सहा भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून अनेक भाविक गंभीर जखमी झाले आहेत. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण जत तालुक्यावर शोककळा पसरली आहे. खा.विशाल पाटील यांनी घटनास्थळी भेट देत दुर्घटनास्थळाची पाहणी केली तसेच दुर्घटनाग्रस्त कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी जत तालुक्याचे माजी आमदार व सांगली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विक्रमसिंह सावंत हेही उपस्थित होते. मरगूबाई यात्रेसाठी मोठ्या संख्येने भाविक मंदिर परिसरात उपस्थित असताना अचानक जोरदार वादळी वारे सुटले. या वाऱ्याच्या तडाख्यामुळे मंदिर परिसरातील पत्राशेड आणि बांधकामाची भिंत कोसळली. काही क्षणांतच परिसरात एकच गोंधळ उडाला. यात्रेसाठी आलेले अनेक भाविक ढिगाऱ्याखाली अडकले. या दुर्घटनेत पांडोझरी, दरीबडची तसेच कर्नाटकातील भाविकांचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. दुर्घटनेनंतर स्थानिक नागरिक, युवक व प्रशासनाने तातडीने मदतकार्य सुरू केले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या जखमींना बाहेर काढून उपचारासाठी विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर खासदार विशालदादा पाटील यांनी संपूर्ण दुर्घटनास्थळाची पाहणी करून प्रशासनाकडून घटनेची माहिती घेतली. त्यांनी जखमींच्या उपचाराबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली तसेच मृतांच्या कुटुंबियांना धीर देत शासन स्तरावरून आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले. यावेळी मा.आ.विक्रमसिंह सावंत यांनीही दुर्घटनास्थळाची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी मृतांच्या नातेवाईकांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले तसेच जखमींची विचारपूस केली. या दुःखद प्रसंगी प्रशासनाने बाधित कुटुंबांना तातडीने सर्वतोपरी मदत करावी, जखमींवर योग्य उपचार व्हावेत आणि यात्रास्थळांवरील सुरक्षेच्या उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली. या प्रसंगी पंचायत समिती सदस्य लक्ष्मण तात्या चव्हाण, माजी सभापती बाबासाहेब कोडग, मा. आप्पाराया बिरादार, सुजय नाना शिंदे, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक रामचंद्र सरगर, रावसाहेब मंगसुळी, नागू मोटे, भगवंत जावीर, आदी मान्यवर उपस्थित होते.

# इंदिरा युनिव्हर्सिटीने द्विशा शर्माच्या स्मरणार्थ 'इंदिरा स्त्री' उपक्रम सुरू

**पुणे : हॅलो प्रभात**




इंदिरा युनिव्हर्सिटी, पुणे येथे आज द्विशा शर्मा हिच्या स्मरणार्थ प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले. द्विशा ही इंदिरा युनिव्हर्सिटीची माजी विद्यार्थिनी आणि तरुण मुलगी होती. हुंडाबळीमुळे झालेल्या तिच्या दुर्दैवी निधनाने संपूर्ण विद्यापीठाला मोठा धक्का बसला आहे. या घटनेमुळे दुःखातून कृतीकडे वाटचाल करण्याची प्रेरणा सर्वांना मिळाली आहे. या प्रार्थना सभेत द्विशाचे आई-वडील ऑनलाईन सहभागी झाले होते. सभागृहात काही क्षण शांतता पाळण्यात आली. त्या शांततेत अनेक भावना दडलेल्या होत्या. इंदिरा युनिव्हर्सिटीच्या प्रेसिडेंट तसेच इंदिरा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या चेअरपर्सन आणि मुख्य मार्गदर्शिका डॉ. तरिता शंकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या सभेत 'इंदिरा स्त्री' या विशेष सहाय्य उपक्रमाची अधिकृत सुरुवात करण्यात आली. हा उपक्रम युनिव्हर्सिटीशी संबंधित सर्व महिलांसाठी सुरू करण्यात आला असून, त्यांच्या आयुष्यातील कोणत्याही टप्प्यावर त्यांना मदत, मार्गदर्शन आणि आधार मिळावा हा त्यामागील उद्देश आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही हा आधार कायम राहणार आहे.

# बारामती बस स्थानक बनले अस्वच्छतेचे आगार?

## प्रवाशांमध्ये संतापाची लाट ; प्रशासनाचे कोट्यवधी रुपये पाण्यात






**बारामती शहर : हॅलो प्रभात**

केदार पाटोळे

राज्य परिवहन मंडळ प्रशासनाच्या वतीने कोट्यवधी रुपये खर्च करून बारामती शहरात उभारण्यात आलेले बसस्थानक हे विविध समस्यांच्या विळख्यात अडकून कचऱ्याचे आगारच बनल्याने येथे येणाऱ्या प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर येऊन याविरोधात प्रवाशांमध्ये नाराजीचे सूर उमटून संताप व्यक्त करून भविष्यात तरी बसस्थानकाची सुधारणा होणार का?हा मुख्य प्रश्न प्रवाशांना पडला आहे. बारामती शहरामध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून अत्यंत आधुनिक, प्रशस्त आणि एअरपोर्टच्या धर्तीवर भव्य बस स्थानक उभारण्यात आले आहे. या बस स्थानकामुळे बारामती शहराच्या सौंदर्यामध्ये आणि प्रतिष्ठेमध्ये भर पडली आहे. परंतु दुर्दैवाची बाब म्हणजे एवढ्या सुंदर आणि आधुनिक बस स्थानकाच्या परिसरामध्ये आज मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता आणि दुर्लक्ष पाहायला मिळत आहे. आज स्वर्गाहून सुंदर असल्याची ओळख असलेल्या व राजकीय नेत्यांनी त्याच्या भाषणात बारामती शहराचा आवर्जून उल्लेख करत असतात. त्यातच राज्यातील विविध भागात जाणाऱ्या प्रवाशासाठी त्यांना चांगल्या सुखसुविधा मिळाव्यात,या उद्देशाने दिवंगत राज्याचे लाडके नेते व उपमुख्यमंत्री यांच्या कार्यकाळात बारामती शहरात भव्य अशा बसस्थानकाची उभारणी केल्याने असलेले बसस्थानक हे स्वर्गाहून देखील अतिशय सुरेख वाटत असल्याने अनेक पक्षातील राजकीय नेते हे आपल्या भाषणात बारामती शहराचाच नाही तर असलेल्या बसस्थानकाचा आवर्जून उल्लेख करत असले तरी पण सध्या ह्या बसस्थानकाला ग्रहण लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. बस स्थानक परिसरामध्ये ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले दिसत आहेत. अनेक नागरिक गुटखा, तंबाखू खाऊन प्रत्येक कोपऱ्यामध्ये थुंकत असल्याने संपूर्ण परिसर विद्रूप झाला आहे. स्वच्छतेसाठी उभारण्यात आलेल्या सुविधा असूनही त्यांचा योग्य वापर आणि देखभाल होत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. आजच्या परिस्थितीत प्रवाशांनी या ठिकाणी प्रवेश करताच प्रथम झाडांच्या वेलींनी फुलून दिसणाऱ्या संबंधित बसस्थानकातील झाडे ही पाण्याअभावी सुकून गेली असल्यामुळे प्रवाशांना उन्हाच्या झळांना सामोरे जाण्याची वेळ येऊन ते हैराण झाले आहेत.याबरोबरच परिसरात वेळेवर साफसफाई कर्मचारी सफाई करत नसल्याने येथील आवारात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचत असल्याने येणाऱ्या नागरिकांना कचऱ्याच्या साम्राज्यास सामोरे जाण्याची वेळ येऊन त्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. येणाऱ्या प्रवासासाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा करण्यात आली आहे.मात्र परिसरात अनेक ठिकाणी देखील मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता असून, स्वच्छतेच्या मूलभूत नियमांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे रोज हजारो प्रवासी या बस स्थानकातून प्रवास करत असताना त्यांना अस्वच्छ वातावरणाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे बारामतीसारख्या प्रगत आणि सुशिक्षित शहराच्या प्रतिमेलाही धक्का बसत आहे.

याबरोबरच परिसरात अनेक गुटखा पंटर हे गुटखा खाऊन गुटख्याच्या पिचकाऱ्या भिंतीवर मारत आहे.त्यामुळे येथील बसस्थानकाच्या भिंती ह्या गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी रंगल्याने अशा गुटखा धारकावर प्रशासन कोणतीच कारवाई करत नसल्याने कचऱ्या पाठोपाठ असलेले बसस्थानक हे गुटख्याचे आगार बनले असल्याचे म्हणण्याची वेळ आली आहे.

त्यामुळे या प्रशासनाने केवळ भव्य इमारती उभारून थांबता कामा नये, तर त्या परिसराची नियमित स्वच्छता, देखभाल आणि शिस्त राखणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. संबंधित विभागाने तात्काळ लक्ष घालून बस स्थानक परिसराची संपूर्ण स्वच्छता करावी, नियमित साफसफाईची व्यवस्था करावी, झाडांना पाणी देऊन त्यांचे संवर्धन करावे तसेच गुटखा खाऊन थुंकणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

**बारामती शहराच्या वैभवाला साजेसा स्वच्छ आणि सुंदर बस स्थानक परिसर राखणे ही प्रशासन आणि नागरिक या दोघांचीही सामूहिक जबाबदारी असून यावर ठोस उपाय करण्याची मागणी बारामतीकराकडून होत आहे. त्यातच बसस्थानकाच्या आवारात महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिस यंत्रणा अथवा सुरक्षा रक्षक नेमणे गरजेचे असताना देखील या ठिकाणी दोन्ही विभागाचा अभाव दिसून येत आहे.त्यामुळे बसस्थानकाच्या आवारात पोलिस कर्मचारी अथवा सुरक्षा रक्षक नेमणे ही काळाची गरज आहे.**